RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १४३]　　शुक्रवार, नोव्हेंबर १४, २०२५/कार्तिक २३, शके १९४७　　[पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ५००**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक आयपीए-२११६/२५१/प्र.क्र.६५/कार्यासन-१.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून व यासंदर्भातील सध्या अस्तित्वात असलेले निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई व विभागीय कार्यालयातील अधीक्षक, गट-ब (अराजपत्रित), प्रमुख लिपिक आणि वरिष्ठ लिपिक, गट-क (सेवाप्रवेश) नियम, २०१८ अधिक्रमित करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या, विधि व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील निबंधक भागीदारी संस्था, मुंबई आणि त्यांची विभागीय कार्यालये यामधील अधीक्षक, गट-ब (अराजपत्रित), प्रमुख लिपिक आणि वरिष्ठ लिपिक, गट-क या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करण्यासाठी याद्वारे पुढील नवीन नियम करीत आहेत, ते असे :—

१. **संक्षिप्त नाव**—या नियमांना, निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि त्यांची विभागीय कार्यालये यामधील अधीक्षक, गट-ब (अराजपत्रित), प्रमुख लिपिक आणि वरिष्ठ लिपिक, गट-क " सेवाप्रवेश नियम, २०२५" असे संबोधण्यात यावे.

२. **व्याख्या**—या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ, निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई जे अधीक्षक, प्रमुख लिपिक आणि वरिष्ठ लिपिक पदांवर उमेदवाराची नियुक्ती करण्यासाठी सक्षम आहेत असा प्राधिकारी असा आहे;

(ख) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा विधि व न्याय विभाग असा आहे;

(ग) "विभागीय कार्यालये" याचा अर्थ, निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कार्यालये असा आहे;

(घ) "पदोन्नतीसाठीची पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी यासंदर्भात निर्गमित केलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेशाव्दारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार पदोन्नतीसाठीची पात्रता असा आहे ;

(ङ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(च) "निबंधक" याचा अर्थ, भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (१९३२ चा ९) मधील कलम ५७ च्या उपकलम (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेले निबंधक, भागीदारी संस्था असा आहे.

**३.** "अधीक्षक" गट-ब (अराजपत्रित), या पदावरील नियुक्ती निबंधक भागीदारी संस्था कार्यालयातील प्रमुख लिपिक हे पद धारण करणाऱ्या व सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि पदोन्नतीसाठीच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने करण्यात येईल.

४. "प्रमुख लिपिक", या पदावरील नियुक्ती निबंधक भागीदारी संस्था कार्यालयातील वरिष्ठ लिपिक हे पद धारण करणाऱ्या व सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि पदोन्नतीसाठीच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने करण्यात येईल.

५. "वरिष्ठ लिपिक", या पदावरील नियुक्ती निबंधक भागीदारी संस्था कार्यालयातील लिपिक-टंकलेखक हे पद धारण करणाऱ्या व सदर पदावर तीन वर्षांहून कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या आणि पदोन्नतीसाठीच्या पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या योग्य व्यक्तींमधून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने करण्यात येईल.

६. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवरील नियुक्ती, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येईल.

७. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येणाऱ्या व्यक्तीने उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, शासनाने, त्याबाबतीत वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. अन्यथा नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नती अनुज्ञेय असणार नाही.

८. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येणाऱ्या व्यक्तीने उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, अगोदरच संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण केलेले नसेल किंवा असे प्रमाणपत्र धारण करण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, शासनाने, त्याबाबतीत वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा काढलेल्या आदेशांनुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील. अन्यथा नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नती अनुज्ञेय असणार नाही.

९. नियम ३, ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या व्यक्तींची सेवाज्येष्ठता यादी राज्यस्तरावर ठेवण्यात येईल आणि अशा व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असतील.

१०. शासकीय कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीनंतर, शासनाने, वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश किंवा शासन निर्णयामध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी, शर्ती देखील शासकीय कर्मचाऱ्यास लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनिषा अ. कदम,**
शासनाचे सहायक सॉलिसिटर-नि-उप सचिव.

## LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 14th November, 2025.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. IPA-2116/251/C.R.65/Desk-1.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of the Superintendent, Group-B (*Non-Gazetted*), Head Clerk and Senior Clerk, Group-C, on the establishment of Registrar of Partnership Firms, State of Maharashtra, Mumbai and its Divisional Offices Recruitment Rules, 2018, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Superintendent, Group-B (*Non-Gazetted*), Head Clerk and Senior Clerk, Group-C on the establishment of Registrar of Partnership Firms, State of Maharashtra, Mumbai and its Divisional Offices under the administrative control of the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra, namely :—

1. *Short title*.—These rules may be called "the Superintendent, Group-B (*Non-Gazetted*), Head Clerk and Senior Clerk, Group-C on the establishment of Registrar of Partnership Firms, State of Maharashtra, Mumbai and its Divisional Offices "Recruitment Rules, 2025".

2. *Definition.*—In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means, the Registrar of Partnership Firms, State of Maharashtra, Mumbai who shall be the competent authority to appoint a candidate to the posts of Superintendent, Head Clerk and Senior Clerk;

(*b*) "Department" means the Law and Judiciary Department of the Government of Maharashtra;

(*c*) "Divisional Offices" means offices under the control of the Registrar of the Partnership Firms, Maharashtra State, Mumbai;

(*d*) "Eligibility for Promotion" means the eligibility for Promotion in accordance with the terms and conditions specified in the rules, resolutions or orders issued by the General Administration Department of the Government, from time to time;

(*e*) "Government" means the Government of Maharashtra;

(*f*) "Registrar" means the Registrar of Firms appointed under sub-section (*1*) of section 57 of the Indian Partnership Act, 1932 (IX of 1932).

3. Appointment to the post of 'Superintendent' Group-B (*Non-Gazetted*) shall be made by promotion of a suitable person having eligibility, for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Head Clerk on the establishment of Registrar of Partnership Firms, and having not less than three years regular and continuous service on the said post.

4. Appointment to the post of 'Head Clerk' shall be made by promotion of a suitable person having eligibility, for Promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Senior Clerk on the establishment of Registrar of Partnership Firms, and having not less than three years regular and continuous service on the said post.

5. Appointment to the post of 'Senior Clerk' shall be made by promotion of a suitable person having eligibility, for Promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Clerk-*cum*-Typist on the establishment of Registrar of Partnership Firms, and having not less than three years regular and continuous service on the said post.

6. The appointment to the posts mentioned in rules 3, 4 and 5 shall be made with the approval of the Appointing Authority.

7. A person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4 and 5 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations, before getting promoted to the said post. Else will not be entitled to the promotion on the posts mentioned in rules 3, 4 and 5.

8. A person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4 and 5 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possess such certificate or has been exempted therefrom before getting promoted to the said post. Else will not be entitled to the promotion on the posts mentioned in rules 3, 4 and 5.

9. A person appointed to the posts mentioned in rules 3, 4 and 5 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra, as the seniority list of the said post is maintained at the State Level.

10. The terms and conditions specified by the Government, in any rules, orders or resolutions issued by the Government, from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the Government Servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

MANISHA A. KADAM,
Assistant Solicitor-*cum*-Deputy Secretary
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.